**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३०७ वा ● गुरुवार २८ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 307 | Date : 27/03/2024 blow Thursday Page 4 Price 4

## पवार गटाच्या १० उमेदवारांची नावे निश्चित

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष राज्यात लोकसभेच्या १० जागा लढवणार असून बुधवारी पार पडलेल्या संसदीय कार्यकारणी समितीमध्ये उमेदवारांची यादी अंतिम करण्यात आली. शुक्रवारी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे पक्षाच्या सर्व उमेदवारांची घोषणा करणार आहेत.



सुमारे चार तास चाललेल्या बैठकीत राज्यातील दहा लोकसभा मतदारसंघातील प्रत्येकी तीन उमेदवारांच्या नावाची चर्चा करण्यात आली. त्यापैकी काही नावे निश्र्चित करण्यात आली. माढामध्ये धैर्यशील मोहीत पाटील, शिरुरमध्ये अमोल कोल्हे, बारामतीत सुप्रिया सुळे, दक्षिण अहमदनगरमध्ये निलेश लंके, भिवंडीमध्ये बाळयामामा म्हात्रे यांची नावे जवळपास निश्र्चित आहेत. दिं डोरीमध्ये चिंतामणी गावित, भास्कर भगरे आणि हरिश्र्चंद्र चव्हाण यांच्या नावावर चर्चा झाली. रावेरमध्ये शिरीष चौधरी, वर्ध्यात अमर काळे तर बीडमध्ये बजरंग सोनवणे **। पान २ वर**

# वंचितकडून ८ जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर

## अकोल्यातून ॲड.प्रकाश आंबेडकर लोकसभा निवडणूक लढविणार



अकोला : वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी स्वतंत्र निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. प्रकाश आंबेडकरांकडून ८ जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. युती करण्याबाबात ते मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यांशी चर्चा करणार आहोत. जरांगे ३० मार्चपर्यंत थांबा म्हणाल्यानं थांबलो आहोत, असे प्रकाश आंबेडकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. अकोल्यातून प्रकाश आंबेडकर स्वत: लोकसभा निवडणूक लढविणार आहेत.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, '' सांगलीमधून प्रकाश शेंडगे यांनी निवडणूक लढविल्यास त्यांना पाठिंबा देणार आहोत. नागपूरमध्ये काँग्रेसच्या विकास ठाकरेंना पाठिंबा देण्यात आला आहे. रामटेकमधील उमेदवाराच्या नावाची घोषणा आज संध्याकाळी ४ वाजता करण्यात येणार आहे.''

**वंचित बहूजन आघाडी उमेदवारांची यादी खालीलप्रमाणे आहे.**

भंडारा गोंदिया -संजय गजानन केवट, गडचिरोली -हितेश पांडुरंग मडावी, चंद्रपूर -राजेश बेले, बुलडाणा -वंसत मगर, अकोला -प्रकाश अंबेडकर,**। पान २ वर**

## लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाची पहिली यादी जाहीर

### राजन विचारे, चंद्रहार पाटील यांना संधी

मुंबई : लोकसभा निवडणुकीची पहिली यादी शिवसेना ठाकरे गटाने जाहीर केली आहे. सांगलीतून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना संधी देण्यात आली आहे. तर ठाण्यातून राजन विचारेंना संधी देण्यात आली आहे. आज यादी जाहीर होईल असं सांगण्यात आलं होतं. त्यानुसार ही यादी जाहीर करण्यात आली आहे. खासदार संजय राऊत यांनी एक्स वर यादी पोस्ट करत लोकसभेचे शिवसेना ठाकरे गटाचे १७ उमेदवार जाहीर केले आहेत.



शिवसेना ठाकरे गटाकडून १७ नावं जाहीर

१) नरेंद्र खेडकर-बुलढाणा

२) संजय देशमुख-यवतमाळ-वाशिम

३) संजोग वाघेरे पाटील-मावळ

**। पान २ वर**

## लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर



मुंबई : भाजपाच्या स्टार प्रचारकांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं जोरदार तयारी केली आहे. भाजपानं मध्य प्रदेश, बिहार, पश्चिम बंगालमधील स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, जेपी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, योगी आदित्यनाथ यांचा समावेश आहे. भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या यादीत महाराष्ट्रातील भाजपाच्या दिग्गज नेत्यांचाही समावेश आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे यांच्याकडं प्रचाराची जबाबदारी देण्यात आली आहे.

प्रत्येक राज्यात ४० स्टार प्रचारक : अठराव्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं चार राज्यांच्या स्टार प्रचारकांची यादी घोषित केली आहे. मध्य प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये भाजपाने ४०-४० दिग्गज नेत्यांची नावं स्टार प्रचारक म्हणून घोषित केली आहेत. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, त्याचप्रमाणे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा समावेश आहे. तर महाराष्ट्र राज्यातील यादीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, यांच्यासह अशोक चव्हाण यांचाही समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील स्टार प्रचारक : भाजपाने महाराष्ट्रासाठी घोषित केलेल्या ४० स्टार प्रचारकांमध्ये केंद्रातील जवळपास सर्वच नेत्यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, नारायण राणे, अनुराग ठाकूर, ज्योतिरादित्य सिंधिया, स्मृती इराणी, रावसाहेब दानवे, रामदास आठवले या केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे. त्याचबरोबर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत या मुख्यमंत्र्यांचासुद्धा महाराष्ट्राच्या यादीमध्ये समावेश आहे. अशोक चव्हाण भाजपाचे स्टार प्रचारक : **। पान २ वर**

## दुष्काळात तेरावा महिना! कांद्याचे दर घसरणार? सरकार करणार ५ लाख टन कांद्याची खरेदी

मुंबई : शेती पिकाच्या संदर्भात केंद्र सरकार सातत्यानं विविध धोरणं अवलंबत आहे. महागाई नियंत्रणात ठेवण्याचा सरकारचा सातत्यानं प्रयत्न सुरु आहे. सध्या कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. कारण, सरकारनं कांदा निर्यातबंदी ३१ मार्चनंतरही कायम ठेवण्याचा निर्णय घेतलाय. त्यामुळं कांद्याचे दर पडले आहेत. अशातच सरकार आता शेतकऱ्यांकडून आता ५ लाख मेट्रीक टन कांद्याची खरेदी करणार आहे. त्यामुळं पुन्हा कांद्याच्या दरात घसरण होण्याची शक्यता वर्तवली जातेय. केंद्र सरकार पुढच्या दोन तीन दिवसात कांदा खरेदीला सुरुवात करणार आहे.



शेतकऱ्यांकडून ५ लाख मेट्रीक टन रब्बी कांदा खरेदी करण्यात येणार आहे. सध्या निर्यातबंदीमुळं कांद्याचे दर घसरले आहेत. अशातच सरकारनं संधी शोधत कमी दरात या कांद्याचे खरेदी केली जाणार आहे. याचा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. सध्या कांद्याला बाजारात ८०० ते १२०० रुपये प्रतीक्विंटलचा दर मिळत आह. तर काही ठिकाणी त्यापेक्षा देखील कमी दर मिळत आहे. कांदा निर्यातबंदी होण्याच्या आधी शेतकऱ्यांचा कांदा ४००० रुपये प्रतिक्विंटलवर गेला होता. मात्र, निर्यातबंदी लागू केल्यापासून कांद्याचे दर घसरत आहेत. याचा मोठा फटका बळीराजाला बसतोय.

शेतकऱ्यांना कसा बसणार फटका?

सध्या बाजारात कांद्याचे दर घसरले आहेत. कारण भारतीय कांदा बाहेरच्या देशात जात नाही. त्यामुळं देशातला कांदा **। पान २ वर**

## अरविंद केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून दिलासा नाहीच



नवी दिल्ली : दिल्ली सरकारच्या कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. केजरीवाल यांच्यासह त्यांच्या पक्षातील इतर साथीदारांनी कथित मद्य धोरण प्रकरणात १०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणात अरविंद केजरीवाल यांच्या चौकशीसाठी तब्बल नऊ वेळा समन्स बजावण्यात आलं होतं. परंतु, अरविंद केजरीवाल चौकशीसाठी हजर राहिले नाहीत, अखेर ईडीने त्यांना गेल्या आठवड्यात अटक केली. या अटकेविरोधात आणि रिमांडवर पाठवण्याच्या निर्णयाविरोधात केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. परंतु, न्यायालयाकडून केजरीवाल यांना याप्रकरणात दिलासा मिळालेला **। पान २ वर**

## साताऱ्यात उदयनराजे यांचे जोरदार शक्ती प्रदर्शन; कोणत्याही परिस्थितीत मी निवडणूक लढविणार

वाई: साताऱ्यात उदयनराजे यांचे जोरदार शक्ती प्रदर्शन करत जंगी स्वागत करण्यात आले. साताऱ्याची भाजपाची उमेदवारी मला मिळाली आहे. कोणत्याही परिस्थितीत मी निवडणूक लढविणार आहे. वरिष्ठ पातळीवर सर्व निश्र्चित झाले आहे .मला कोणीही ताटकळत ठेवलं नाही. देशाची निवडणूक आहे त्यामुळे प्रक्रियेला वेळ तर लागणारच. आघाडीच्या चर्चेचा विषय असल्याने उमेदवारी जाहीर करणे थोडे लांबणीवर पडत आहे. काहीही झाले तरी मी निवडणूक लढविणार आहे असे खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात शिरवळ येथे सांगितले .

दिल्लीतील मुक्काम संपवून साताऱ्यात आलेल्या खासदार उदयनराजे यांचे आज जंगी स्वागत करण्यात आले. साताऱ्याच्या सीमेवर निरा नदी ओलांडून येताच त्यांच्या समर्थकांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले. जेसीबीच्या माध्यमातून त्यांच्यावर जोरदार पुष्पवृष्टी करण्यात आली. क्रेनच्या माध्यमातून काही टन वजनाचे हार त्यांना घालण्यात आले. उदयनराजे साताऱ्यात प्रवेश करतेवेळी महामार्गाला जत्रेचे स्वरूप आले होते. मोठ्या संख्येने त्यांचे समर्थक या ठिकाणी उपस्थित होते. ढोल ताशे छत्र चामरे अशा राजेशाही थाटात त्यांचे स्वागत करण्यात आले. शिरवळ पासून सातारा पर्यंत त्यांची जंगी मिरवणूक **। पान २ वर**



## धैर्यशील मोहिते पाटील-लोकसभा लढवणारच : जयसिंह मोहिते पाटील



पंढरपूर/प्रतिनिधी: खासदार शरद पवार यांच्या शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने तुतारी या चिन्हावर लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते पाटील हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातून निवडणूक लढवणार असल्याची माहिती माळशिरस तालुक्याचे ज्येष्ठ नेते जयसिंह (बाय दादा) मोहिते पाटील यांनी दिले आहे आता होणारे लोकसभा निवडणुकीत माढा बारामती व कोल्हापूर या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचा उमेदवार निवडून येऊ शकत नाही यासोबत मान करमाळा माळशिरस व सांगोला या ठिकाणी विधानसभेच्या शुद्ध नक्कीच फटका बसणार आहे असे मत जयसिह मोहिते पाटील यांनी व्यक्त केली.अकलूज येथे पत्रकार परिषद पत्रकाराची संवाद साधताना जयसिंह मोहिते पाटील बोलत होते यावेळी धैर्यशील मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती

## सोलापूर लोकसभेचे भाजपचे उमेदवार राम सातपुते पुन्हा चर्चेत

पंढरपूर/प्रतिनिधी:सोलापूर लोकसभा भाजपचे उमेदवार राम सातपुते पुन्हा चर्चेत आले आहेत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर सोलापुरातील राजकीय वातावरण हळूहळू तापू लागले आहे या मतदारसंघात महाविकास आघाडी कडून आमदार प्रणिती शिंदे यांना तर भाजपकडून आमदार राम सातपुते यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे दरम्यान एक सर्वसामान्य ऊसतोड कामगाराचा मुलाच्या प्रॉपर्टीच्या हिशोब मागणाऱ्या माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांनी गेल्या ४० वर्षातील प्रॉपर्टीचा आधी हिशोब द्यावा अशी मागणी भाजपचे सोलापूर लोकसभेचे उमेदवार राम सातपुते यांनी केली आहे काल रात्री सातपुते यांच्या निवासस्थानी माळशिरस तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या कृतज्ञता मेळावा आयोजित केला होता या मेळ्यात बोलताना रान सातपुते यांनी काँग्रेस उमेदवार प्रणिती व त्यांचे पिता सुशील कुमार शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला व सातपुते म्हणाले मी एक ऊस तोड कामगाराचा मुलगा आहे सामान्य कुटुंबातील आहे मी बी टेक आहे माझी बायको देखील बी टेक इंजिनियर आहे झाले आहे तिची आयटी कंपनी आहे आम्ही सर्व कर्ज काढून घर बांधले आहे मी माझ्या प्रॉपर्टीचा हिशोब देतो सुशील कुमार शिंदे यांनी आपल्या प्रॉपर्टीचा हिशोब देवा व काँग्रेस उमेदवाराला माळशिरस तालुका व सोलापूर जिल्ह्यात आहे हे अजून माहिती नाही मी मराठी शाळेत शिकलोय तुम्ही इंग्लिश स्कूलमध्ये शिकला आहे शिकून असा चिमटा ही सोलापूर लोकसभेची भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी चिमटा काढला आहे



## आचारसंहितेमुळे एप्रिल,मे व जून महिन्याचा लोकशाही दिन स्थगित

सोलापूर/प्रतिनिधी: सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी आणि अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असते. परंतु मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. प्राप्त निवडणुक कार्यक्रमानुसार पुणे विभागातील सोलापूर जिल्हयांमध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात **। पान २ वर**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

## मनसे मर्यादित राहू इच्छिते काय

लोकसभा निवडणुकीसाठीची लगबग सुरू असताना महाराष्ट्रातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या गोटात मात्र कमालीची शांतता होती. त्यामुळे या गडबडीत राज ठाकरे यांचा पक्ष काय निर्णय घेणार या विषयी राजकीय निरीक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. तशातच अलीकडे राज यांनी दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शहा आणि भाजपच्या एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याची भेट घेतल्याची बातमी आली. राज यांची आता महाराष्ट्रातील महायुतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्याच्या बातम्याही लगोलग यायला लागल्या. अजून त्या बाबतचे अंतिम धोरण स्पष्ट झालेले नसले तरी सारा रागरंग राज हे महायुतीच्या दिशेनेच निघाल्याचा आहे. त्यांचा भाजपला किंवा त्यांच्या महायुतीला मोठा प्रासंगिक लाभ होऊ शकतो. कारण उध्दव ठाकरे यांचा झंझावात रोखण्यासाठी त्यांना राज ठाकरे उपयोगी पडू शकतात हे बहुतांशी खरे आहे. पण महायुतीत जाऊन राज यांच्या पदरात काय पडणार हा मात्र एक मोठा प्रश्न आहे. मुळात महायुतीत शिंदे गट, अजित पवार गट आणि भाजप हे तीन मोठे पक्ष असताना त्यांना या चौथ्या पार्टनरची गरजच का भासली हा प्रमुख प्रश्न आहे. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि त्यांच्या मित्र पक्षांनी जो झंझावात निर्माण केला आहे त्यांना रोखणारा प्रभावी नेता महायुतीकडे नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने जणू पक्ष फोडण्याचा चंगच बांधला आहे. मात्र त्यांच्या रणनितीमुळे जनतेच्या मनात भाजपबद्दल कमालीची नाराजी पसरत आहे. अजित पवार, एकनाथ शिंदे यांचा शिवसेना किंवा महाविकास आघाडीला रोखण्याच्या कामात फारसा उपयोग होत नसल्याचे लक्षात आल्यानेच बहुधा आयत्यावेळी या चौथ्या पार्टनरला घेण्याचा प्रयत्न भाजपने चालवला असावा असा याचा अर्थ निघू शकतो. पण आणखी एका पक्षाला आपल्यात ओढून महायुतीत किती खिचडी होणार आहे याचा हिशेब भाजपच्या नेतृत्वाने लावला आहे काय, हा मुख्य प्रश्न आहे. मुळात तीन पक्षांतील जागावाटपाचा तिढा कायम असताना आता पुन्हा मनसेला आपल्यात घेऊन त्यांना नेमक्या किती जागा दिल्या जाणार आहेत हाही प्रश्न आहेच. काही जणांच्या म्हणण्यानुसार केवळ एक-दोन जागा देऊन मनसेची बोळवण केली जाईल. पण मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मात्र राज यांचा भाजपला उपयोग होऊ शकतो त्यासाठीचा हा गेम प्लॅन असावा. मुंबई महापालिका जिंकण्याला भाजपचे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठीची ही योजना असेल तर केवळ तेवढ्यावर मनसे मर्यादित राहू इच्छिते काय हेही पाहावे लागेल.

प्रति
महायुतीचा महिरपी कंस साकार करणारे उपमुख्यमंत्री
मा ना श्री देवेंद्र फडणवीस यांना खुले पत्र

**आदरणीय देवेंद्रभाऊ**

आज घडीला महाराष्ट्र राज्याचे उमुख्यमंत्री म्हणून तुम्ही जेव्हढी लक्षवेधी कामगिरी करता त्यापेक्षा कैकपटीने तुम्ही महायुतीचे प्रमुख महानेते म्हणून सबंध महाराष्ट्राचे लक्षवेधत आहात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या नेत्यांमध्ये देवेंद्र फडणवीसच महायुतीचे मध्यवर्ती केंद्र ठरत आहे.

वैदर्भीय नरकेसरी देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व महायुतीने आणि अवघ्या महाराष्ट्राने स्वीकारले आहे याचा आम्हाला आनंद आहे.आपण आपल्या नेतृत्वाचे कौशल्य दाखवीत शिवसेनेचे दोन भाग करीत महायुती चे सरकार पुन्हा राज्यात स्थापन केले तेंव्हा मदमस्त हत्तीचे गंडस्थळ फोडून जिंकलेल्या वनराज सिंहासारखे आपल्या राज्यात स्वागत झाले.मात्र राजमुकुट जिंकून ही परत करण्याची उदारता दाखविणारा राजा नाही सदा सर्वकाळ मन जिंकणारा महाराजा होतो तसे तुम्ही मुख्यमंत्री पदाचे दावेदार असताना त्या पदाचा त्याग करून उपमुख्यमंत्री पद स्वीकारून तुम्ही इतिहास घडविलात. एक आदर्श उभा केला.त्या आपल्या त्यागाची बरोबरी कोण करेल? कोणी राजकीय नेता चालून आलेले मुख्यमंत्रीपद त्यागण्याचा मनाचा मोठेपणा दाखवू शकतो हे आपण सिद्ध करून दाखवल्या बद्दल आपले आम्ही मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करतो.



उपमख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळताना आपण महाराष्ट्रात भाजप ची महायुतीची सर्व सूत्रे हाती घेऊन काम करू लागलात. काम म्हणजे राजकिय कौशल्य असे दाखवू लागलात की जणू राजकीय चमत्कार घडत आहेत. राज्यात काँग्रेस चे मोठे मोठे नेते भाजप मध्ये पर्यायाने महायुती मध्ये दाखल झाले. शिवसेना दोन भागात फुटली तशी उभी फूट राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये पडली. अजितदादा पवार आपला पक्ष घेऊन महायुतीमध्ये आले. त्यामुळे महायुतीच्या कंसात असणारी भाजप शिवसेना आणि आर पी आय यांच्या सोबत राष्ट्रवादी आल्याने महायुती चा कंस हा महिरपी कंस झाला. कंसात कंस वाढवून देवेंद्रभाऊ तुम्ही महायुती चा महिरपी कंस केला.आता महायुती मध्ये भाजप शिवसेना रिपाइं रासप आणि आता महाराष्ट्र नवनिर्माण सेने ला सामावून घेतांना महायुती च्या जागा वाटपाचे गणित त्याची आकडेवारी या महायुती च्या महिरपी कंसात कशी बसवणार तुम्ही? हे गणित तुम्ही लीलया सोडवाल याची आम्हाला खात्री आहे. पण रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपाइंलां झालेली जखम तुम्ही कशी भरून काढणार?

शिवसेना भाजप युतीला रामदास आठवले यांच्या रिपाइं ने साथ दिल्यामुळेच युतीची महायुती झाली.त्या महायुतीची बाजू घेत रामदास आठवले रज्यभर देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी भाजपच्या पाठीशी खंबीर उभे राहिले. देशभर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कसे चांगले नेते आहेत.ते कसे संविधानप्रेमी आहेत हे जनतेला समजावत देशभर एन डी ए चा घटक दल नेता म्हणून रामदास आठवले हे मोदींचे समर्थन करीत राहिले. गेली १२ वर्षे ना. रामदास आठवले आणि त्यांचा रिपाइं भजप महायुती एन डी ए चे समर्थन करीत आला आहे. मनसे आणि राज ठाकरे हे भाजप मोदी आणि महायुती वर तुटून पडत असताना भाजप मोदी आणि महायुतीच्या बचावासाठी संघार्षनायक रामदास आठवले धावून येत असत. भाजपचे मोदींचे सर्वाधिक समर्थन करणारा महायुतीचा नेता रामदास आठवले असून त्यांचा सारखा मित्र धर्म पाळणारा नेता कोणी नाही. रामदास आठवले यांच्या सारखा प्रामाणिक नेता मित्र राजकारणात मिळणे सोपे नाही. तुम्ही मात्र आज रामदास आठवलेंसारख्या कोहिनूर हिऱ्या कडे दुर्लक्ष करून गारगोट्या गोळा करीत आहात. गायीचा चारा गाढवाला देत आहात.चोराला मुका देऊ नका. चोर सोडून सन्यासीला फाशी देऊ नका ही जनतेची भावना तुम्ही ओळखावी.

महायुती चा महिरपी कंस वाढवताना रिपाइं ला वजा करण्याचे गणित करू नका. रिपाइं ला वजा करू पाहणाऱ्यांच्या गुनाकाराचे उत्तर भगाकार रुपात होते. जे रिपाइं ला सन्मान देतात त्यांचे १२ चा वर्ग १४४ होतो आणि जे रिपाइं ला धोका देतात त्यांचे रिपाइं १२ वाजवते हा इतिहास आहे. तुम्ही रिपाइं प्रमुख रामदास आठवले यांना आंबेडकरी जनतेचा ढाण्या वाघ म्हणून सन्मान दिलात.तुमच्यामुळेच रिपाइं प्रमुख रामदास आठवले यांना दोन वेळा केंद्रात राज्यमंत्री पद मिळाले. राज्यात राज्यमंत्री पद अविनाश महातेकर यांना आणि राज्य मंत्री पदाचा दर्जा राजा सरवदे यांना मिळाला. विधानसभेत मात्र रिपाइं ला जागा सोडल्या नाहीत. आता लोकसभा निवडणुकीत महायुती चे जागा वाटप होत असताना रिपाइं च्या नावचाही उल्लेख नाही. रिपाइं ला जागा सोडणार की नाही कोणतीही घोषणा नाही. महायुती मध्ये नवनवे पक्ष घेऊन तुम्हीच तुमच्या पायावर धोंडा मारून घेत आहात. मनसे कडे जाण्याची अवदसा तुम्हाला का सुचली असा तुम्हाला रिपाइं चा प्रश्न्न आहे.

मराठा आंदोलन आणि मनोज जरांगे इफेक्ट मोठा आहे त्याचा विचार करून लोकसभा निवडणुकीत भाजपचा तोटा आहे असा कोणी अंदाज तुम्हाला दिला असेल तर त्याची तमा नका बाळगू. मोदी सरकार ने आर्थिकदृष्ट्या मागासांना इडबल्यूस चे १० टक्के आरक्षण दिले त्याचा लाभ मराठा समाजाने घेतला आहे. तुम्हीही मराठा आरक्षण कायदा केला आहे. त्यामुळे मराठा समाज योग्य तो निर्णय घेईल. पण मनसे ला घेऊन मराठा तीतुका मेळवावा चा प्रयोग यशस्वी ठरणार नाही.उलट मनसे मुळे परप्रांतीय मिळणारी मते थेट काँग्रेसकडे जातील. त्यामुळे तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे राहील. त्यामुळे आपल्या मूळ महायुती च्या मित्रांवर विश्र्वास ठेऊन लोकसभेच्या युद्धात उतरा...तुमच्या सोबत एकनाथ शिंदे; अजितदादा पवार आणि रामदास आठवले असे रथी महारथी योद्धे आहेत.

प्रकाश आंबेडकर यांची वंचित स्वतंत्र लढली तर त्याचा लाभ महायुती ल होईल यात शंका नाही.पण तरीही सर्व दलित मतदार वंचित कडे जाणार नाही त्यामुळे रामदास आठवले यांच्या कडे असणारा

रिपब्लिकन मतदार निर्णायक ठरत आला आहे.कोणतीही लाट असो की नसो ; आकाश पाताळ एक झाले तरी रामदास आठवले यांच्या सोबत असणारा रिपब्लिकन मतदार कधीही त्यांना सोडुन जात नाही. मागच्या २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत सातारा मतदारसंघात रिपाइं चे जील्हा अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी ८३ हजार मतदान मिळवले होते. असे सर्व जिल्ह्यात रिपाइं चे मातब्बर पँथर रामदास आठवलेंसोबत आहेत. प्रत्येक लोकसभा मतदार संघात आज दलितांसोबत सर्व जातधर्माच्या मतदारांचा ओढा रिपाइं कडे आहे. अशोक गायकवडांप्रमाणे अविनाश महातेकर राजा सरवदे गौतम सोनवणे पप्पू कागदे बाबूराव कदम भूपेश थुलकर विजय सोनवणे प्रकाश लोंढे सूर्यकांत वाघमारे परशुराम वाडेकर सिद्धार्थ कासारे रमेश मकासरे चंद्रकांताताई सोनकांबळे महेंद्र गायकवाड अशी मोठी यादी आहे.

संघार्षनायक रामदास आठवलेंच्या पाठीशी देशभरातील आंबेडकरी जनता दलित मुस्लिम बहुजनांच्या एकजुटीची भीमशक्ती उभी आहे. त्यांना डावलण्याचे पाप करू नका जनता तुम्हाला माफ करणार नाही. तोडणे सोपे जोडणे अवघड हा भगवान बुद्धांनी दिलेला संदेश आम्ही मानत आहोत त्यामुळे तुमच्या शी जोडलेले भाजप रिपाइं शिवसेना चे महायुती बंधन आम्ही बंधुत्वा सारखे पाळत आहोत. तुम्ही सुद्धा हे बंधुत्व पाळा म्हणजे महायुती च्या उमेदवारांच्या गळ्यात पडतील विजयाच्या माळा !!

**हेमंत रणपिसे, प्रसिद्धीप्रमुख**

पान १ वरुन

## पवार गटाच्या १० उमेदवारांची..

आणि नरेंद्र काळे यांच्या नावावर चर्चा झाली. सातारामध्ये खासदार श्रीनिवास पाटील यांनी यावेळी लढण्यास असमर्थता व्यक्त केली. त्यांचा मुलगा सारंग यास येथून उमेदवारी दिली जाऊ शकते. वर्धा मतदारसंघातून अनिल देशमुख यांना लढण्याचा आग्रह झाला. मात्र त्यांनी नकार दिला. महायुती कोणते उमेदवार देते, त्यामुळे मतदारसंघातील जातीची गणिते काय होतील, हे पाहून राष्ट्रवादीचे काही उमेदवार बदलले जाऊ शकतात. त्यामुळे राष्ट्रवादीची यादी गुलदस्त्यात आहे. शिवसेना २२, काँग्रेस १६ आणि राष्ट्रवादी १० असे जागावाटपाचे सूत्र निश्र्चित ठरल्याचे पवारांनी सांगितले.

## लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या

महाराष्ट्रातील प्रमुख स्टार प्रचारकांच्या यादीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, अशोक चव्हाण, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा मुंबई अध्यक्ष, आशिष शेलार, भाजपा नेत्या पंकजा मुंडे, तसंच मंत्री चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, अतुल सावे या मंत्र्यांचा समावेश आहे. यासोबत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणसुद्धा भाजपाचे स्टार प्रचारक असणार आहेत.

राज ठाकरेंबाबत अद्याप संभ्रम : विशेष म्हणजे महाराष्ट्रात महायुतीत राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेण्याच्या प्रयत्नात असून अद्याप याबाबत निर्णय झालेला नाही. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मागील दिवसात दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर मनसे महायुतीत सामील होणार या चर्चेला उधाण आलं आहे. याबाबत अद्याप चर्चा, बैठकांच सत्र सुरू असून राज ठाकरे महायुतीसोबत गेल्यास राज्यातील प्रमुख प्रचाराकांच्या यादीत राज ठाकरे एक नंबरचे नेते ठरतील यात शंका नाही.

## दुष्काळात तेरावा महिना..

देशातच राहतोय, त्यामुळं दरात घसरण होतेय. अशातच सरकार आता ५ लाख मेट्रीक टन कांदा खरेदी करणार आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. कारण, सध्या सरकार कमी दरात कांदा खरेदी करणार आहे. हा खरेदी केलेला कांदा सरकार स्टॉक करणार आहे. ज्यावेळी बाजारात कांद्याचे दर वाढतील, त्यावेळी सरकार हा स्टॉक केलेला कांदा बाहेर काढेल. हा कांदा बाहेर काढला की आपोआपच कांद्याचे दर पडतील. कारण बाजारात मोठ्या प्रमाणात कांद्याचे आवक वाढेल त्याचा परिणाम दरांवर होईल.

३१ मार्चनंतरी निर्यातबंदी कायम राहणार

कांद्याचे वाढते दर नियंत्रीत ठेवण्यासाठी सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ८ डिसेंबर २०२३ रोजी सरकारने हा निर्णय घेतला होता. यावेळी सरकारने ३१ मार्चपर्यत कांद्याच्या निर्यातीवर बंदी असेल असे सांगितले होत. मात्र, पुन्हा एक परिपत्र काढून ही बंदी ३१ मार्चनंतरही कायम राहणार असल्याचे सरकारने सांगितले आहे. त्यामुळं शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

## अरविंद केजरीवाल यांना दिल्ली ..

नाही. उलट या अटकेविरोधात उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे. न्यायालय येत्या ३ एप्रिल रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी करेल.

२१ मार्च रोजी ईडीने केजरीवाल यांना त्यांच्या शासकीय निवासस्थानातून अटक केली होती. त्यानंतर राऊस एव्हेन्यू न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत धाडलं. ईडीच्या अटकेला आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या केजरीवाल यांच्या याचिकेवरून न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी ईडीला नोटीस बजावली असून त्यांच्याकडे या अटकेप्रकरणी उत्तर मागितलं आहे. न्यायालयाने ईडीला २ एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे.

## साताऱ्यात उदयनराजे यांचे जोरदार..

काढण्यात आली आहे.

साताऱ्याची लोकसभेची जागा महायुतीने अद्यापही जाहीर केलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उदयनराजे यांनी घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवावी असे सांगितलेले आहे. मात्र उदयनराजे हे कमळ या चिन्हावरच निवडणूक लढविण्यावर ठाम आहेत. आजच्या मिरवणुकीत कमळ चिन्ह असलेला रथ सामील करण्यात आला होता.

यावेळी पत्रकारांशी बोलताना उदयनराजे म्हणाले,मी निवडणूक लढविणारच आहे. माझी साताऱ्यात लोकसभेची तयारी सुरू होती. माझे दौरे सुरू होते .परंतु काही कारणास्तव मला दिल्लीला जावे लागले .तेथे गेल्यानंतर मला तिथे कोणीही मला ताटकळत ठेवलेले नाही. ही देशाची निवडणूक आहे. त्यामुळे वरिष्ठांची चर्चेला वेळ तर लागणारच. जिथे पहिल्या टप्प्यात दुसऱ्या टप्प्यात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. तेथील लोकांशी अगोदर चर्चा करणे गरजेचे असते आणि लोकसभेची निवडणूक ही मोठी प्रक्रिया असते. त्यामुळे मला तिथे कोणी ताटकळ ठेवलेले हे सगळं खोटं आहे. माझे वरिष्ठांशी बोलणे झालेले आहे. माझी उमेदवारी निश्र्चित आहे. मला भाजपातील सहकार्य करणारी सर्व मित्रमंडळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर घटक पक्ष या सर्वांशी चर्चा झालेली आहे. पक्षश्रेष्ठींनी मला निवडणूक लढविण्यास सांगितलेले आहे. मी या ठिकाणी मोठ्या उत्साहाने आलो आहे हीच माझी उमेदवारी आहे.त्यामुळे शंका घेण्याचे कोणतेही कारण नाही, असेही उदयनराजे म्हणाले.

## आचारसंहितेमुळे एप्रिल,मे व जून

येणार आहेत. सदर निवडणुकांची आचारसंहिता दि.१६ मार्च ते ०६ जून, २०२४ पर्यंत लागु आहे. त्यामुळे माहे एप्रिल, मे व जुन या महिन्यातील पहिल्या सोमवारी आयोजित लोकशाही दिनाचे आयोजन होणार नसल्याचे निवासी उप जिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे..

शासन परिपत्रक दि.२६ सप्टेंबर २०१२ मधील मुद्दा क्र.५.७ मधील नमूद तरतुदीनुसार ज्या क्षेत्रामध्ये निवडणुकीकरिता आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये, असे निर्देश आहे. त्या अनुषंगाने आचारसंहिता कालावधीत माहे एप्रिल, मे व जुन या महिन्यात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार नसल्याचे, निवासी उप जिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

## वंचितकडून ८ जागांसाठी उमेदवारांची

अमरावती- प्राजक्ता पिल्लेवार, वर्धा -प्रा. राजेंद्र साळुंखे, यवतमाळ वाशिम - खेमसिंग पवार

अंतिम यादी २ एप्रिलपर्यत जाहीर होईल- मनोज जरांगे यांच्यासोबत झालेल्या चर्चेविषयी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ''परिवर्तनाच्या राजकारणाला नव्याने सुरुवात करण्याबाबत मनोज जरांगे यांच्याशी चर्चा झाली. जास्तीत जास्त उमेदवार हे गरीब समुदायातील असणार आहेत. त्यांनाच पुढे आणले जाईल,'' अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. पुढे आंबेडकर म्हणाले की, जे स्वच्छ चारित्र्याचे आणि गरीब आहेत आणि काहीतरी करण्यासाठी प्रयत्न आहेत, त्यांनाच उमेदवारी दिली जाईल. अंतिम यादी ही २ एप्रिलपर्यत जाहीर होईल. एक नवीन आघाडी आम्ही उभी करत आहोत. आम्ही त्यांना सांगत होतो की, जरांगे पाटील यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पण ते मान्य करायला तयार नव्हते. वंचित बहुजन आघाडीचा वापर हा घराणेशाही वाचवण्यासाठी केला जात होता. त्याला आम्ही नाकारले आहे.

वंचितच्या उमेदवारांना जरांगे पाटील यांचे समर्थन- आंबेडकर म्हणाले की, ''महाराष्ट्रात उपेक्षितांची, वंचितांची आणि गरीब मराठा, मुस्लीम यांची नवीन वाटचाल आहे, असे आम्ही मानतो. या वाटचालीला समूह पाठिंबा देईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. पहिल्या टप्प्यातील वंचितच्या उमेदवारांना जरांगे पाटील यांचं समर्थन आहे. ३० तारखेनंतर काही जागांबाबत आम्ही दोघे मिळून निर्णय घेणार आहोत,'' असे आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

हे नेते पत्रकार परिषदेला उपस्थित- वंचितची पत्रकार परिषद अकोल्यातील हॉटेल सेंट्रल प्लाझा येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर, ज्येष्ठ नेते अशोकभाऊ सोनोने, राज्य उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, प्रदेश प्रवक्ता फारुख अहमद, महिला आघाडी राज्य महासचिव अरुंधती शिरसाट, राज्य प्रवक्ता

## लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे

४) चंद्रहार पाटील-सांगली
५) नागेश आष्टिकर-हिंगोली
६) चंद्रकांत खैरे-छत्रपती संभाजी नगर
७) ओमराजे निंबाळकर-धाराशिव
८) भाऊसाहेब वाघचौरे-शिर्डी
९) राजाभाऊ वाजे-नाशिक
१०) अनंत गीते-रायगड
११) विनायक राऊत-सिंधुदुर्ग, रत्नागिरी
१२) राजन विचारे-ठाणे
१३) अनिल देसाई- मुंबई दक्षिण मध्य
१४) संजय दिना पाटील-मुंबई ईशान्य
१५) अरविंद सावंत-मुंबई दक्षिण
१६) अमोल किर्तीकर-मुंबई वायव्य
१७) संजय जाधव-परभणी

## जागतिक लिंगायत महासभा प्रदेश कार्याध्यक्षपदी हत्तुरे

सोलापूर/प्रतिनिधीः जागतिक लिंगायत महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी युवा नेते विजयकुमार हत्तुरे यांच्या निवडीची घोषणा बेळगाव येथे झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत महासभेचे प्रधान सचिव डॉ. शिवानंद जामदार केली. महासभेचे महाराष्ट्र प्रभारी तथा कलबुरगीचे जिल्हाध्यक्ष प्रभुलिंग महागावकर यांनी हत्तुरे यांना निवडीचे पत्र देऊन त्यांचा सन्मान केला. महाराष्ट्र राज्यातील लिंगायत समाज एकत्रित करून संघटनेचा राज्यभर विस्तार करण्यात येणार आहे. समाजाच्या उन्नतीसाठी या संघटनेत युवकांना प्राधान्य देणार असल्याची माहिती हत्तुरे यांनी दिली. याप्रसंगी महासभेचे प्रदेशाध्यक्ष राजशेखर तंबाके (कोल्हापूर), उपाध्यक्ष मल्लिकार्जुन मुलगे, सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ. शिवानंद गोगाव, ज्येष्ठ साहित्यिक चन्नवीर भद्रेश्वरमठ, राजश्री थळंगे, विजयकुमार बावी, नागेंद्र कोगनुरे, अमोल म्हमाणे, डॉ. बसवराज नंदर्गी, शिवराज कोटगी, राजेंद्र होदे, डॉ. भीमाशंकर सिंदगी, सदाभाऊ पाटील, डॉ. राजेंद्र खसगी, नामदेव फुलारी, सकलेश बाबुळगावकर, मंगल कार्यालय असोसिएशनचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, बसवराज चाकाई, नागेश पडनुरे, श्रीशैल पॅडशिंगे, सिध्दाराम कटारे, श्रीशैल वाले, संतोष पाटील, नागेश धुम्मा उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## पंढरपूर तहसील कार्यालय ते खाजगी इसम १००० हजाराच्या लाजप्रकरणी अँटी करप्शन च्या जाळ्यात

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तहसीलदार कार्यालयात ज्वेलरी विभागात काम करत असलेली खाजगी समाज लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाज घेताना रंगेहात पकडले यामध्ये पंढरपूर तहसीलदार कार्यालयामध्ये खळबळ उडाले आहे पंढरपूर तहसीलदार कार्यालयातील खाजगी भागवत बागल हा तहसील कार्यालयात जेलर विभागात खाजगी कारकून म्हणून काम पाहत होता पोलिसात दाखल झालेल्या दखलपात्र गुन्ह्यात मदत करण्यासाठी तडजोड म्हणून एक हजार रुपयाची लाज घेताना भागवत जनार्दन बागल राहणार गादेगाव तालुका पंढरपूर यास लाचलितपत प्रतिबंधक विभागाचे मंगळवारी दिनांक २६ रोजी दुपारी तहसील कार्यालयात ही कारवाई करण्यात आली फिर्यादीवर दखलपात्र गुन्हा दाखल झाला होता

यामध्ये जामीन घेण्यास मदत करण्यासाठी भागवत बागल यांनी एक हजार रुपये ची मागणी केली होती या मागणीच्या विरोधात काही दिवसापूर्वी फिर्यादीने लाच लूतपत विभागाकडे संबंधित विषयाची तक्रार दाखल केली होती या तक्रारीची कातर जमा करून लाचल उत्पद विभागाच्या अधिकाऱ्यांनी सफरचून अखेर मंगळवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली या कारवाईमुळे तहसील मधील कर्मचाऱ्यांमध्ये या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे

ही कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक लाचलुचपत विभाग पुणे येथील श्री अमोल तांबे ड्रॉ शीतल जानवे खराडे अप्पर पोलीस अधीक्षक लाचलुचपत विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक गणेश कुंभार यांनी दमदार कामगिरी करून केली आहे

## माढा लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाची पंढरपुरात शुक्रवारी महत्वपूर्ण बैठक

पंढरपूर/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार आणि पुढील रणनिती आखण्याबाबत पंढरपुरात दिनांक २९ मार्च रोजी सकाळी ठीक ११






वाजता महावीर नगर हॉटेल विठ्ठल इन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.शिवसेना नेते विनायक राऊत,शिवसेना नेते सुनील प्रभू ,शिवसेना समन्वयक विश्र्वनाथ नेरुरकर यांच्या आदेशाने सदर बैठकीचे आयोजन केले असल्याची माहिती शिवसेना उबाठा गटाचे पंढरपूर विभाग जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांनी दिली आहे.

शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ हे या बैठकीत मार्गदर्शन करणार असून या बैठकीत शिवसेना प्रवक्ते प्रा.लक्ष्मण हाके,उपनेत्या अस्मिता गायकवाड,उपनेते शरद कोळी,जिल्हा प्रमुख धनंजय डिकोळे,स्वप्नील वाघमारे सहसचिव युवा सेना,युवा सेना जिल्हा युवा अधिकारी गणेश इंगळे,सचिन बागल,महिला आघाडी जिल्हा संघटक ॲड.पूनम अभंगराव,आशा टोणपे,शेतकरी सेनेचे जिल्हा संघटक शिवाजी जाधव,डॉक्टर्स सेल महिला जिल्हा संघटक राजश्री क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या बैठकीस उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, सर्व विधानसभा संपर्क प्रमुख,विधानसभा प्रमुख,विधानसभा संघटक,विधानसभा समन्वयक,उपतालुकाप्रमुख, शहर प्रमुख, शहर समन्वयक, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, गटप्रमुख, बुथ प्रमुख, बीएलए एजंट, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख आदी पदाधिकारी तसेच युवासेना,संलग्न संघटनेचे पदाधिकारी,महिला आघाडीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे.माढा लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी करण्याचा निर्धार या बैठकीच्या माध्यमातून केला जाणार असून त्यामुळे आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना पंढरपूर विभाग जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांनी केले आहे.

## नळदुर्ग महाविद्यालयात जागतिक जल दिन विविध उपक्रमाने साजरा



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे ग्रीन क्लब समन्वयक प्रा डॉ उध्दव भाले आणि सहसमन्वयक प्रा डॉ निलेश शेरे यांच्या संकल्पतून तसेच उच्च शिक्षण मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांच्या परिपत्रका नुसार 'ग्रीन क्लब ' च्या वतीने जागतिक जल दिन विविध उपक्रमांने साजरा करण्यात आला.

त्यामध्ये महाविद्यालयांच्या प्रांगणात पाणी व्यवस्थापन आणि पाणी बचत अनुशंगाने सर्व पोस्टर्स ग्रीन क्लब विध्यार्थी, प्राध्यापक यांच्यामार्फत विध्यार्थ्यामध्ये पाणी बचती संदर्भाने जनजागृती होण्यासंबंधाने सर्व विध्यार्थी, प्राध्यापक व इतर शिक्षकेतर कर्मचारी गोलाकार पद्धतीने उभे राहून ग्रीन क्लबची कार्यप्रणाली पहात होते. ह्या वेळी प्राचार्य डॉ सुभाष राठोड, उपप्राचार्य डॉ रामदास ढोकळे उपस्थित होते. त्या दरम्यान ग्रीन क्लब समन्वयक प्रा डॉ उध्दव भाले यांनी जागतिक जल दिन आपण का साजरा करित आहोत? आणि पाणी जपून वापरण्या संबधाने सर्वांना विस्तृत असे मार्गदर्शन केले आणि महाविद्यालयांतील ग्रीन क्लब कार्याची वाटचाल ही सांगितली. त्यानंतर पाणी व्यवस्थापण आणि पाणी बचत ह्यावर आधारित विविध सहा विषय घेऊन निबंध स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती त्यासंदर्भाने विजेत्या विध्यार्थ्यांना प्रमाणपत्र ही देण्यात आले.

प्रथम क्रमांक कु संजना बनसोडे, द्वितीय क्रमांक आशिष पाटील आणि कु अर्पिता बशेट्टी, तृतीय क्रमांक शुभम मारेकर आणि उत्तेजनार्थ कु पूजा काळे, आश्र्विनी शिंदे, लोंढे समर्थ, आश्र्विनी जवळकोटे आणि वृषाली घंटे याना मिळाला.

या कार्यक्रमानंतर वनस्पतीशास्त्र विभागात जागतिक जल दिनानिमित्त रुषीकेश जेऊरे कु पूजा काळे, कु किर्ती इटकरी, ओमकार राजमाने, आशिष पाटील प्राचार्य डॉ सुभाष राठोड, उपप्राचार्य डॉ रामदास ढोकळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले . या वेळी प्राचार्य डॉ सुभाष राठोड, उपप्राचार्य डॉ रामदास ढोकळे, प्रा डॉ उध्दव भाले, प्रा डॉ हसमबेग मिर्झा, प्रा डॉ तुळशीराम दबडे, प्रा डॉ दयानंद भोवाळ आणि प्रा डॉ लक्ष्मण थिट्टे आदी ग्रीन क्लब विध्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. प्रा डॉ निलेश शेरे यानी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयांतील प्रा प्रशांत अमृतराव, प्रा डॉ दयानंद भोवाळ, प्रा डॉ हसमबेग मिर्झा, प्रा डॉ तुळशीराम दबडे , प्रा डॉ दिपक जगदाळे, प्रा डॉ समीर पाटील , प्रा डॉ अनिरुद्ध बाबरे प्रा डॉ हंसराज जाधव, प्रा आशिष हंगरगेकर, प्रा डॉ लक्ष्मण थिट्टे, डॉ कपील सोनटक्के, प्रा डॉ अतिश तिडके, डॉ अशोक कांबळे, प्रा. बाबासाहेब सावते प्रा डॉ दिपक जगदाळे , प्रा म्हमाणे, प्रा देव्हारे व आदी प्राध्यापक,श्री बारीक शिंदे, संशोधक विद्यार्थी श्री किरण हंताळकर, श्री अमर वाघोले ग्रीन क्लब युवा अध्यक्ष रुषीकेश जेऊरे, विध्यार्थी समन्वयक श्री अभिषेक जाधव आणि आदी ग्रीन क्लब मधील सर्व सक्रिय विध्यार्थी विध्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते .

## आमदार राम सातपुते यांच्या भेटी गाठी सुरु

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर लोकसभेचे भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी काशीपीठाचे जगद्गुरू श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सोमवारी आमदार सातपुते यांचे सोलापुरात आगमन झाले. मंगळवारी सकाळी त्यांनी अक्कलकोट रस्त्यावरील होटगी मठातील पंचमुखी परमेश्वर मंदिरात पूजा केली. यानंतर काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींची भेट घेऊन दर्शन घेतले. यावेळी आमदार



विजयकुमार देशमुख भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शिवानंद पाटील, नागेश भोगडे, चिदानंद मुस्तारे, शशिकांत रामपुरे, सिध्दाराम दुधनी, बसवराज गंदगे आदी उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांची भेट घेतली. यावेळी काळे यांच्यासह माजी नगरसेवक अनंत जाधव हे उपस्थित होते. सावंत यांच्या भेटीनंतर होटगी रस्त्यावरील आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी आमदार सातपुते दाखल झाले. लोकसभा निवडणुकीसंदर्भात यावेळी त्यांनी आमदार देशमुख यांच्याशी चर्चा केली. तेथून त्यांनी उद्योजक सिध्देश्वर पाटील यांची भेट घेतली. दुपारच्या सत्रात राष्ट्रवादीचे नेते आणि मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची अनगर येथे जाऊन आमदार सातपुते यांनी भेट घेतली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष काळे उपस्थित होते.

## जिवे मारण्याचा प्रयत्न केलेल्या सदलापुरच्या सहा आरोपींना शिक्षा'

शिरवळ/ हणमंत घोदे :'शिरवळ ता. अक्कलकोट येथील यात्रेतील कुस्तीत दंगा करून दोघांना जिवे मारण्याचा प्रयत्न केलेल्या सदलापुरच्या सहा आरोपींना शिक्षा झाले आहे' सन २०१३ मध्ये शिरवळचे ग्रामदैवत श्री पंचलींगेश्र्वर च्या यात्रेत सकाळी सलीम सक्करगी, श्याम यादव यांची सदलापुरचे काशीनाथ पंचमगिरी, अप्पू गड्डेवडी व समीर बिराजदार यांचेशी वाहन कट मारण्यावरून वाद झाला. तो वाद गावकऱ्यांनी मिटवून सर्वांना घरी पाठविले. परंतु संध्याकाळी मंदिराजवळ कुस्त्या चालु असताना सकाळच्या वादाचे राग मनात धरून काशीनाथ हणमंत पंचमगिरी, अंबाजी हणमंत पंचमगिरी, शरणप्पा हणमंत पंचमगिरी, समीर राजीव बिराजदार, लक्ष्मण उर्फ अप्पू गुद्देवाडी, मल्लिनाथ शंकर पाटील, विजयकुमार गुरप्पा गुडेवाडी, या लोकांनी कुस्तीत दंगा घडवून आणला आणि भीमराव बाब्रुवान यादव व सलीम सक्करगे यांना काठी, लोखंडी गज, दगड अशा हत्याराने जिव घेण्याच्या उद्देशाने मारहाण करून जबर जखमी केले होते. यातील भीमराव यादव हा जवळपास दीड महिना उपचारास अश्र्विनी हॉस्पिटल मध्ये दाखल होता. घटनेची फिर्याद सलीम सक्करगे याने उत्तर पोलिस स्टेशन अक्कलकोट येथे दिल्यानंतर पोलिसांनी वरील सात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०७,३२७,३२४,३४१,१४७,१४८,१४९,५०४ अन्वये गुन्हा नोंद केला व तपास -झख भरते यांनी केले. सदरचा गुन्हा नोंद झालेनंतर सात आरोपींपैकी समीर बिराजदार याने त्याला सलीम सक्करगे, भीमराव यादव, श्याम यादव व लक्ष्मण चव्हाण यांनी दगड, काठीने मारहाण करून जखमी केले आहे अशी फिर्याद दिली होती त्यावर या चौघांच्या विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला व त्याचा तपास सहा.पो. फौजदार रेडे-पाटील यांनी केले. सदर दोन्ही प्रकरण सोलापूर जिल्हा व सत्र न्यायाधीश पांढरे साहेब यांच्या कोर्टात सुनावणी होवून आज अंतिम निकाल देण्यात आला. सदर निकाल प्रमाणे सदलपुरच्या ६ आरोपींना ७ वर्षाची सक्तमजुरी व प्रत्येकी १४००/- दंड. तसेच यातील प्रत्येक आरोपीकडून फिर्यादी सलीम सक्करगे यास ३०००/- आणि जखमी भिमराव यादव यास १०,०००/- देण्याचा आदेश कोर्टनी केला आहे. विशेष म्हणजे सलीम सक्करगे, भीमराव यादव यांच्यावर असलेल्या केसमधून कोर्टनी त्यांची निर्दोष सुटका केली आहे. यात सरकारी वकील म्हणून अपर्णा कुलकर्णी मॅडमनी काम पहिले तर काशीनाथ पंचमगिरी वगैरे कडून रवीं. धनंजय माने यांनी केस चालविली. निर्दोष झालेल्या शिरवळचे सलीम सक्करगे व भीमराव यादव यांचेकडून ॲड. संतोष खोबरे यांनी केस चालविली.

## श्रीमती रुपावती परीट यांना शिव पुरस्कार प्रदान





कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील कनिष्ट लेखनिक श्रीमती रुपावती आण्णा परीट यांना आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा कृती समिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील केलेल्या विशेष योगदानाची दखल घेऊन शिव पुरस्कार शिव - महोत्सव २०२४ च्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.श्रीमती परीट यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रशासकीय व प्रवेश विभागाचे कामकाज पाहताना विद्यार्थी हित डोळ्यासमोर ठेऊन नियमानुसार व पारदर्शक कामकाज पाहिलेले आहे.त्यांच्या या कामाची दखल शिवाजी विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा कृती समिती घेऊन त्यांना शिव पुरस्कार प्रदान केलेला आहे.

श्रीमती परीट पुरस्कार स्वीकारल्यानंतर म्हणाल्या की, विद्यार्थी हित डोळ्यासमोर ठेऊन पारदर्शक व प्रामाणिकपणे काम केल्याची ही पोहोच पावती आहे. त्याबद्दल आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा कृती समितीचे विशेष आभार याबद्दल संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे, उपकुलसचिव डॉ.एस.एम.कुबल, सी.एस.कोतमिरे,डॉ. प्रवीण कोडोलीकर,डॉ.सी.ए.बंडगर, यांच्यासह सर्व समन्वयक, सहा.प्राध्यापक,प्रशासकीय कर्मचारी, अभ्यासकेंद्र समन्वयक व लेखनिक,विद्यार्थी यांनी श्रीमती परीट यांचे अभिनंदन केले आहे.

## नळदुर्ग मध्ये हिंदू व मुस्लिम बांधवाचे एकतेचे दर्शन

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ओळख आहे या शहरांमध्ये अनेक जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने नांदतात नळदुर्ग शहरांच्या तुलनेत किमान ३० हजाराच्या आसपास लोकसंख्या असून या शहरांमध्ये सर्व धर्माचे लोक राहतात परंतु बारकाईने या गोष्टीकडे लक्ष दिले तर प्रत्येक धर्माचे लोक एक मेकाच्या जयंती उत्साहामध्ये



समाविष्ट होतात त्याच पद्धतीने आज रोजी नळदुर्ग शहरात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक जगदाळे यांच्या प्रयत्नातून नळदुर्ग शहरात हिंदू व मुस्लिम बांधवांचे एकतेचे दर्शन दिसून आले त्यामुळे नळदुर्ग शहरांमध्ये खूप चांगल्या पद्धतीने एकमेकाला गळा भेट देत एकमेकांना शुभेच्छा देतात आणि हिंदु व मुस्लीम बांधवाच्या सणामध्ये मोठ्या उत्साहात सहभागी होतोत दरवर्षा प्रमाणे यावर्षीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक जगदाळे यांच्या वतीने २६ मार्च रोजी मुस्लिम बांधवांसाठी नळदुर्ग येथील नानीमॉ दर्गाह समोरील प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. इफ्तार पार्टीची सुरुवात खासदार ओमराजे निंबाळकर व अशोक जगदाळे यांच्या हस्ते हजरता नानीमॉ सरकार रहे अलै यांच्या मजारीवर चादर अर्पण करण्यात आली. त्यानंतर रिजवान काजी यांच्या वतीने खासदार ओमराजे निंबाळकर व अशोक जगदाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी, शहेबाज काजी, नितीन कासार, माजी उपनगराध्यक्ष शरीफ शेख, इमाम शेख, माजी नगरसेवक शब्बीर कुरेशी, बसवराज धरणे, कमलाकर चव्हाण, जेष्ठ पत्रकार विलास येडगे पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे अमर भाळे तन्वीर अली खतीब, अख्तर काजी अमृत पुदाले, सरदार सिंग ठाकूर, महेबूब शेख,रुकनोद्दीन शेख अजमत जाहगीरदार, सलमान काझी,ताजोद्दीन सय्यद, मन्सूर शेख, मिन्हाजोद्दीन इनामदार यांच्यासह राजकीय सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. इफ्तार पार्टीचा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कुदरत शेख, हाजी खतीब, मोहसीन जागीरदार, इरफान जागीरदार, दीपक काशीद, नवल जाधव,प्रवीण चव्हाण अमित शेंडगे यांच्यासह इत्यादी जणांनी परिश्रम घेतले.

## सोलापूरकरांची होरपळ; पारा ४१.४ अंशावर

सोलापूर/प्रतिनिधीः शहराच्या तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून मंगळवारी यंदाच्या उन्हाळ्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. सोलापूर शहर व परिसरात ४१.४ अंश सेल्सिअस एवढे कमाल तापमान पोहोचले.

मार्च महिन्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली असून वाढत जाणारे हे तापमान मेमध्ये आणखी किती वाढेल अशी भीती शहरवासियांमधून व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत मैदानावर दिसणारी मुले, आता घरातच मोबाइलवर गेम्स, व्हिडिओ, रिल्स पाहण्यात दंग असल्याचे दिसू लागले आहेत. सूर्यनारायणाने आपले रौद्ररुप दाखविण्यास सुरुवात केली आहे. शनिवारी पारा ३९.७ अंश, रविवारी ४० अंश, सोमवारी ४०.६, तर मंगळवारी ४१.४ अंश सेल्सिअसवर पोहोचला. त्यामुळे शहरवासियांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. यामुळे युवती आणि महिला डोके व तोंडाला स्टोल बांधू लागले आहेत.

दुपारच्या वेळी शहरातील रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. आवश्यक कामाशिवाय नागरिक घराबाहेर पडताना दिसत नाहीत. ग्रामीण भागात भर उन्हात काम करणाऱ्या शेतकरी व मजुरांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असून शक्यतो शेतीची कामे सकाळच्यावेळी करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे. येत्या काही दिवसात तापमानात आणखीन वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरातील थंड पेय सेंटरच्या ठिकाणी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. लिंबू सरबत, कोकम, नारळपाणी, आईस्क्रीम, ताक, उसाचा रस आदी थंड पदार्थांच्या मागणीत वाढ झाली आहे.

# महाराष्ट्र एटीएस प्रमुख सदानंद दातेंची एनआयएच्या महासंचालक पदी नियुक्ती

मुंबई : महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख सदानंद दाते यांची नियुक्ती राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या महासंचालक पदी करण्यात आली आहे. मोदी सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. २६/११ चा हल्ला झाला तेव्हा अतुलनीय शौर्य दाखवणारे अधिकारी म्हणजे सदानंद दाते. त्यांना आता मोदी सरकारने महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.१९९० च्या तुकडीत भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी असललेले दाते यांनी महाराष्ट्र पोलीस दलात अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. मुंबई पोलीस पोलीस दलात त्यांनी कायदा व सुव्यवस्था सहपोलीस आयुक्तपद भूषवले होते. याशिवाय मिरा-भाईंदर पोलीस दलाच्या आयुक्तपदाची धुराही दाते यांनी सांभाळली होती. केंद्रातही सीआरपीएफमध्ये प्रतिनियुक्तीवर त्यांनी काम केले होते. २६-११ ला मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यातही त्यांनी शौर्य दाखवून दहशतवाद्यांना तोंड दिले. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, खलिस्तानी कारवाया आणि अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि जगाच्या इतर भागांतील दहशतवाद्यांचा तपास करण्याबरोबरच, एनआयएकडे पीएफआय संबंधीत तपास सुरू आहेत. त्यांच्याकाळात एटीएसने पाकिस्तानी हनीट्रॅप, बांगलादेशी नागरिकांविरोधील कारवाई, पीएफआयप्रकरणात छापेमारी अशा विविध कारवाया केल्या होत्या



सदानंद दाते हे मागच्या ३० वर्षांहून अधिक काळ पोलीस सेवेत कार्यरत आहेत. पोलीस सेवेतल्या विविध अनुभवांवर त्यांनी 'वर्दीतील माणसांच्या नोंदी' हे पुस्तक लिहिलं आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच त्यांना यूपीएससी संदर्भात कळलं. त्यावेळीच त्यांनी पोलीस सेवेत जायचा निर्णय घेतला. समाजासाठी काहीतरी करण्याचा ध्यास त्या वयात त्यांनी घेतला होता. यूपीएससी परीक्षा पास झाल्यानंतर आयएएस, आयपीएस आणि ख--ड असे तीन पर्याय होते. सदानंद दातेंनी आयपीएस हा पर्याय निवडला आणि पोलीस खात्यात आले.

# क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षण लक्षपूर्वक घ्यावे

सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत जिल्हातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया होणार आहे. यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षण लक्षपूर्वक घ्यावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक प्रशिक्षण व्यवस्थापनचे नोडल अधिकारी संतोष देशमुख यांनी केले.

नियोजन भवन येथे आयोजित सर्व क्षेत्रीय अधिकारी (झोनल ऑफिसर) यांच्या निवडणूक प्रशिक्षण कार्यशाळेत उपजिल्हाधिकारी देशमुख मार्गदर्शन करत होते. या प्रशिक्षणास नियुक्त सर्व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी श्री देशमुख पुढे म्हणाले की प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्या कामात एकसूत्रीपणा राहावा यासाठी हे जिल्हास्तरीय प्रशिक्षण आवश्यक असून सर्व अधिकाऱ्यांनी हे प्रशिक्षण लक्षपूर्वक घ्यावे. तसेच या प्रशिक्षणातून मतदान केंद्रावरील सर्व निवडणूक प्रक्रियेची माहिती समजून घेऊन त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.



त्याप्रमाणेच कायदे प्रक्रिया व मा.भारत निवडणूक आयोगाकडील नवनवीन सूचना याची पूर्ण माहिती, मतदान केंद्राध्यक्षाची भूमिका, ईव्हीएम तसेच व्हीव्हीपॅट आदी यंत्रणाबाबत सविस्तर माहिती प्रत्येक क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. तसेच पोस्टल मतदानासाठी करावी लागणारी प्रक्रिया, निवडणुकीचे महत्व समजून प्रत्येकाने दिलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षणात दिलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांचे तंतोतंत पालन करावे तसेच निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून देण्यात आलेले साहित्याचे वाचन करून प्रत्येक बाबीची सूक्ष्म माहिती घ्यावी, अशा सूचना श्री. देशमुख यांनी दिल्या. यावेळी श्री. देशमुख यांनी उपस्थित सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया अत्यंत सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व बाबींची अत्यंत सविस्तर व प्रात्यक्षिके दाखवून प्रशिक्षण दिले.

# भगवंत प्राप्तीसाठी नामसंकीर्तन हा सर्वोत्तम मार्ग : मोरे

सोलापूर/प्रतिनिधीः आयुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी भगवंताचे चिंतन कायम केले पाहिजे. भगवंत प्राप्तीसाठी नामसंकीर्तन हा सर्वो त्तम मार्ग आहे, असे प्रतिपादन जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प. शिरीष महाराज मोरे यांनी केले.

छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक मंडळाच्या (शिवस्मारक) भजन स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी शिवस्मारक सभागृहात ह.भ.प. शिरीष महाराज मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, संचालक आणि स्पर्धा प्रमुख धनंजय कुलकर्णी, परीक्षक स्मिता देशपांडे, रंजन पंचवाडकर उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. ह.भ.प. शिरीष महाराज मोरे म्हणाले, जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांनी भजन प्रमाण आहे, असे सांगितले आहे. समाज आज वेगळ्या वाटेने जात असताना भजनाकरिता समूह एकत्र येणे ही कौतुकाची बाब आहे. भजनामुळे भगवंताच्या नित्य सान्निध्यात राहता येते. पुण्यप्राप्ती आणि पापातून मुक्ती हे भगवंताच्या नामाचे वैशिष्ट्य आहे. ईश्वराच्या चिंतनाने जन्मोजन्मीची पापे धुवून निघतात. सलोकता, समिपता, स्वरूपता आणि सायुज्यता मुक्तीची प्राप्ती करायची असेल तर भगवंताचे नामसंकीर्तन केले पाहिजे, असेही ह.भ.प. शिरीष महाराज मोरे यांनी सांगितले. उद्घाटनानंतर विविध भजनी मंडळांनी भजने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रत्येक सादरीकरणानंतर उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात दाद दिली. शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर यांनी सूत्रसंचालन तर संचालक धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

# श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती कर्मचाऱ्याच्या मृत्युची सखोल चौकशी व्हावी आणि नातेवाईकांना अर्थसहाय्य करावे : गणेश अंकुशराव

पंढरपुर/प्रतिनिधी : २६ मार्च रोजी पंढरपुर येथील श्रीविठ्ठल मंदिरातील मंदिर समितीच्या कर्मचार्याचे हृद्यविकाराने दुःखद निधन झाले. अवघ्या २५ वर्षाच्या या तरुण कर्मचार्याच्या मृत्यूची सखोल चौकशी व्हावी आणि त्याच्या नातेवाईकांना मंदिर समितीकडुन अर्थसहाय्य द्यावे तसेच कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी द्यावी, अशी मागणी महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केली आहे.

श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या आस्थापना व लेखा विभागात कार्यरत असलेले चैतन्य कुलकर्णी (वय २५) यांना मंदिरात कर्तव्यावर असताना काल दिनांक २६ मार्च रोजी दुपारी सहकार्यांसोबत जेवण झाल्यानंतर अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दुर्घटना घडली. अवघ्या २५ वर्षाच्या चैतन्य कुलकर्णी यांना हृदयविकाराचा असा धक्का आल्याने मृत्यु झाल्याने त्याच्या कुटुंबार दुःखाचा डोंगर कोसळलाय, घरातला कर्ता सवरता आधार ऐन तारुण्यातच गमावल्याने कुलकर्णी कुटुंबावर आभाळ कोसळलंय. चैतन्य कुलकर्णी हे कुठल्या ताण-तणावात होते का? त्यांना कोणी त्रास देत होते का? याबाबत सखोल चौकशी व्हावी तसेच त्यांच्या कुटुंबाला मंदिर समितीच्या वतीने तातडीने आर्थिक मदत करावी आणि कुटुंबातील एका व्यक्तीस मंदिर समितीवर नोकरी द्यावी. अशी मागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे.

# अडीचशे कोटींचे एमडी जप्त, १० जणांना अटक

मुंबई: मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सांगली येथील मेफेड्रोन निर्मितीचा कारखाना उद्धवस्त केला. कुर्ला, सांगली, गुजरातमधील सूरत या ठिकाणी कारवाई करत पोलिसांनी २५२ कोटी रुपयांचे एमडी जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. कुर्ला येथे गुन्हे शाखेच्या कक्ष ७ च्या पथकाने वरिष्ठ निरीक्षक महेश तावडे यांच्या नेतृत्वाखाली परवीन बानो शेख (३३) या महिलेला ६४१ ग्रॅम एमडीसह अटक केली. १६ फेब्रुवारीला करण्यात आलेल्या कारवाईत १२ लाख २० हजार व २५ ग्रॅम सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले. निरीक्षक आत्माजी सावंत यांनी तिची चौकशी केली असता मीरारोड येथील व्यक्तीकडून हे एमडी घेतल्याचे तिने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी मीरारोड येथील एमडी विक्रेता साजीद शेख उर्फ डेबस (२५) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सहा कोटी किंमतीचा तीन किलो एमडी व तीन लाख ६८ हजार रुपयांची रोकड असा मुद्देमाल मिळून आला. त्याच्या चौकशीत तो सुरत येथील दोघांना एमडी विकत असल्याचे समोर आले. त्यानुसार निरीक्षक शिंदे, उबाळे, सपोनि अमोल माळी, उपनिरीक्षक स्वप्निल काळे, रामदास कदम, शेलार व पथकाने सुरतेला जाऊन इजाजअली अन्सारी (२४) आणि आदिल बोहरा (२२) या दोघांना अटक केली. चौकशीत ते सांगलीतून हा एमडी घेत असल्याचे सांगितले. त्यानुसार उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सांगलीतले इरळे गाव गाठून द्राक्षाच्या शेताच्या आड लपून गुपचूप सुरू असलेला एमडीचा कारखाना उद्धवस्त केला. त्याठिकाणी १२२ किलो ५०० ग्रॅम वजनाचा एमडी,एमडी बनविण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करून सहा जणांना अटक केली. सांगलीतून पोलिसांनी प्रविण शिंदे (३४), वासुदेव जाधव (३४), प्रसाद मोहिते (२४), विकास मलमे (२५), अविनाश माळी (२८) आणि लक्ष्मण शिंदे (३५) अशा सहा जणांना अटक करण्यात आली आहे. यातील प्रविण हा मुख्य आरोपी असून मुळचा सांगलीचा असलेला प्रविण परिवारासह मीररोड येथे स्थायीक झाला होता. १० पर्यंत शिकलेल्या प्रविणने चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशात जाऊन एमडी बनविण्याचे प्रशिक्षण घेतले. आरोपी प्रविणला प्रत्येक किलो मागे एक लाख रुपये मिळत होते.

# इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध


मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेच्या अंतरिम उत्तरसूचीसंदर्भात विहित मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेपांवर विषय तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन परीक्षा परिषदेने सुधारित केलेली अंतिम उत्तरसूची परिषदेच्या https://www.mscepuppss.in आणि https://www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असल्याची माहिती परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेची इयत्तानिहाय, माध्यमनिहाय, पेपरनिहाय अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची दि. ६ मार्च २०२४ रोजी परिषदेच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आली होती. अंतरिम उत्तरसूचीसंदर्भात विहित मुदतीत प्राप्त झालेल्या आक्षेपांवर विषय तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन परीक्षा परिषदेने उत्तरसूची सुधारित केली आहे. या उत्तरसूचीतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. या अंतिम उत्तरसूचीबाबत आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. या अंतिम उत्तरसूचीच्या आधारे निकाल तयार करण्यात येईल, असेही परिषदेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोलापूर जिल्ह्यात तीव्र पाणी टंचाई; पाणी पुरवठ्याच्या सामाजिक कामासाठी आचारसंहितेमधून मुभा द्या,

## आमदार प्रणिती शिंदे यांचे निवडणूक आयोगाला पत्र

सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाच्या झळा जाणवायला सुरुवात झाली असून गावोगावी नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रतिवर्षी पाणी टंचाईची झळ बसू नये म्हणून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाणी वाटपासाठी प्रशासनासह विविध समाजसेवी संघटनांकडून पाण्याचे टँकर पुरवले जातात. मात्र यावेळी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे टंचाईग्रस्त भागात पाणी वाटप करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. हीच अडचण ओळखून आमदार प्रणिती शिंदे यांनी टंचाईग्रस्त भागात सामाजिक संघटनांकडून पाणी वाटप करण्यासाठी आचारसंहितेमधून मुभा द्यावी, अशी विनंती करणारे पत्र राज्य निवडणूक आयोगाला दिले आहे.



प्रणिती शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, यावर्षी सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी माता-भगिनींना पायपीट करावी लागत आहे. शेतीसाठी दूरचीच गोष्ट, पण जनावरांसाठी पाणी मिळणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे पाण्याचा हा प्रश्न मिटवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर त्वरित हालचाल करणे आवश्यक आहे. यासाठी प्रतिवर्षी पाणी टंचाईच्या काळात अनेक सेवाभावी संस्था, राजकीय पक्ष, समाजातील दानशूर व्यक्ती ग्रामीण भागात पिण्याचे पाणी पुरवण्याची सोय करत असतात. शासकीय स्तरावरही काही प्रमाणात पाण्याची सोय केली जाते. मात्र आत्ता लोकसभा निवडणुका जाहीर झाल्याने आणि आचारसंहिता सुरु असल्याने अनेकांना पाणी पुरवठा करण्याच्या या समाजपयोगी कामात आचारसंहितेमुळे अडथळे येण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील जनतेची पाण्याअभावी समस्या निर्माण होऊ नये यासाठी ज्या ज्या सामाजिक संस्था संघटनांकडून गावोगावी पाणीपुरवठा केला जातो, अशा संस्था संघटनांना पाणी वाटप करण्यास आचारसंहितेमधून मुभा मिळावी. जेणेकरून ग्रामीण भागातील पाण्याची टंचाईची भेडसावणार नाही. तसेच उन्हाळ्यात पाणीटंचाईमुळे तहानलेल्या नागरिकांना दिलासा मिळेल.

सोलापूर जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रणिती ताई शिंदे यांनी पत्रात पुढे असे म्हटले आहे, की प्रशासनाकडूनही ग्रामीण भागात अथवा पाणीटंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठ्यासाठी टँकर सुरू केले तर उत्तम होईल. याशिवाय सामाजिक संघटना, संस्थांना पाणी वाटपाची परवानगी द्यावी, यासाठी



निवडणूक आयोगाची परवानगी आणि सहकार्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दखल घेत टंचाईग्रस्त भागात पाणी वाटप करण्याची मुभा द्यावी, अशी विनंती देखील आमदार शिंदे यांनी केली आहे. आमदार प्रणिती शिंदे यांनी दिलेल्या पत्राची निवडणूक आयोगाकडून दखल घेतली गेल्यास जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात पाणी वाटप करणे सुकर होणार आहे. तसेच शहर आणि ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न मिटणार असून या दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना भेडसावणारा जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील मार्गी लागणार आहे.

# स्टार प्रवाहच्या मुरांबा मालिकेत येणार नवं वळण

अभिनेता आशय कुलकर्णीची होणार धमाकेदार एण्ट्री, तीन वर्षांनंतर आशयचं टेलिव्हिजनवर दमदार पुनरागमन



स्टार प्रवाहच्या मुरांबा मालिकेला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळत आहे. अक्षय आणि रमाची जोडी प्रेक्षकांची लाडकी जोडी ठरत आहे. अक्षय आणि रमाच्या या प्रेमाच्या मुरांब्यात रेवा मात्र अडसर ठरतेय. वेगवेगळी कारस्थानं करुन रमा आणि अक्षयला वेगळं करु पहाणाऱ्या रेवाच्या आयुष्यात मात्र आता नवं वादळ येणार आहे. मालिकेत लवकरच रेवाचा नवरा म्हणजेच अथर्वची एण्ट्री होणार आहे. अभिनेता आशय कुलकर्णी रेवाच्या नवऱ्याची म्हणजेच अथर्वची भूमिका साकारणार आहे. मुरांबा या मालिकेतल्या भूमिकेविषयी सांगताना आशय म्हणाला, 'स्टार प्रवाह वाहिनीसोबत काम करण्याची इच्छा होती ती या मालिकेच्या निमित्ताने पूर्ण होतेय. जवळपास तीन वर्षांनंतर पुन्हा मालिकेत काम करतोय. मुरांबा मालिकेत मी खलनायक साकारणार आहे. खलनायक साकारताना पात्र एका साच्यात अडकत नाही. त्यामुळे नवनवे प्रयोग करण्याची मुभा असते. हळूहळू मला हे पात्र गवसत आहे. शशांक केतकरसोबत मी याआधी काम केलं आहे त्यामुळे आमची मैत्री होतीच. इतर कलाकारांसोबतही छान गट्टी जमली आहे. मुरांबा मालिकेच्या सेटवर खेळीमेळीचं वातावरण आहे. त्यामुळे नवं कुटुंब मिळालं आहे असं म्हणता येईल.'

अथर्वच्या येण्याने मालिकेत नेमकं कोणतं नवं नाट्य घडणार हे पहाणं उत्सुकतेचं असेल. तेव्हा पाहायला विसरु नका मुरांबा दुपारी १.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.**स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**